**वादी तर्फे साक्षीदार क्र. – ०१** **नि.दि.दा.क्र.५०/२०१८**

**लक्ष्मीबाई विरुध्द सुनील**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की** **निशाणी – ३०**

**उलटतपास प्रतिवादी तर्फे वकील श्री कुशवाह यांच्यातर्फे**

सदरची केस भिंत बांधण्यासाठी दाखल केली. ती केस दाखल केलेल्या मिळकतीचा नंबर मला माहिती नाही. ती जागा ९ x ८ या मापाची आहे. मला जागेच्या चतुरसिमा काय असतात ते समजत नाही. मी नकाशा बनविला नव्हता. दावा मिळकतीवर इंजीनियरला बोलाविले नव्हते. जेथून सुर्य उगवितो त्या बाजूला दावा मिळकती मध्ये भिंत आहे. जेथे सुर्य मावळतो त्या बाजूला दावा मिळकती मध्ये दुकान आहे व उर्वरीत दोन्ही बाजूकडे भिंत आहे. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकत नझुल मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की नझुल विभागाला दाव्यात पक्षकार केले नाही. हे म्हणणे खरे आहे की बांधकाम करण्यासाठी नझुल विभागाची परवानगी लागते. हे म्हणणे खरे आहे की मी नझुल विभागाकडून बांधकामाकरीता परवानगी घेतली होती. या दाव्यामध्ये नझुल विभागाकडून परवानगी मिळाल्याबाबतचे कागद मी दाखल केले नाही. ४० ते ५० वर्षापूर्वी तशी परवानगी मी घेतली होती.

हे म्हणणे खरे नाही की आजरोजी दावा मिळकत ग्राउंड लेवल ला आहे. मी भाडेच्या पावत्याकामी दाखल केल्या आहेत. जुन २०१५ मध्ये मी शेवटी भाडे दिले होते. मी न्यायालयात भाडे जमा केले नाही. मी दुकान कुठेही चालवित नाही. मी सध्या भुषण नगर मध्ये राहते. हे म्हणणे खरे नाही की नया बाजार येथे राहत असतांना माझ्या पतीने फुलचंद यांच्या विरुध्दात केस दाखल केली होती. माझा कब्जा असल्याबाबत मी फोटो दाखल करु शकते. साक्षीदार स्वतःहून सांगते की इमारतीचे छत व घर पूर्णपणे पाडले आहे. त्या इमारतीचा फक्त पुढील दरवाजा शिल्लक आहे. हे म्हणणे खरे नाही की आजरोजी दावा मिळकतीवर भिंत, सामान असे काहीही नाही. माझ्या कडे ताज लॉड्री या नावाचे गुमास्था परवाना नाही. हे म्हणणे खरे आहे की ताज लॉड्री यांची मालकी दाखविणारे कागदपत्रे माझ्या कडे नाही.

मला या केसची सर्व माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी कोणतेही काम करीत नाही. माझे पती एम.ई.एस. या कंपनी मध्ये काम करीत होते. हे म्हणणे खरे आहे की माझा मुलगा लॉड्रीचे काम करतो. प्रतिवादी भाडे वाढवून मागत असल्याबाबत व त्रास करीत असल्याबाबत मी त्यांना नोटीस काढली होती. प्रतिवादी घर खाली करण्याबाबत मला धमकावित असल्याबाबत मी रिपोर्ट दाखल केली होती. मी माझ्या कडे स्वतंत्र रुम होती हे दाखविण्यासाठी त्याचा फोटो दाखल केला आहे.

ऑगस्ट २००० मध्ये काय झाले होते याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांकडील खोटा रिपोर्ट मी दाखल केला. चार वर्षापासून माझा दावा मिळकतीवर कब्जा नाही. दिनांक १०/०८/२०००, १६/०९/२००० व ११/०२/२००१ रोजी काय झाले होते याची मला माहिती आहे. त्या तिन्ही दिवशी माझे सामान प्रतिवादीने बाहेर फेकले होते. मी माझे सामान पुन्हा जागेवर ठेवण्यासाठी व कब्जा मिळण्यासाठी केस दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकती माझे दुकान होते व तेथे भिंत बांधली होते हे मी खोटे सांगत आहे. मी तात्पुरत्या मनाईचा अर्ज नामंजूर झाल्यानंतर त्यावर अपील दाखल केली होती. अपील प्रलंबित आहे. बुनकर कॉलनी जेथे जनावरांचा दवाखाना आहे तो भाग मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की तेथे मी लॉड्रीचे दुकान चालविते. साक्षीदार सांगते की तेथे माझ्या मुलीचे दुकान आहे, त्या दुकानात मी तिच्या सोबत काम करते. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे मला दावा मिळकतीची आवश्यकत नाही.

दावा मिळकती मध्ये असलेले माझे दुकान ज्यावेळी मी चालवित होते ते ५० वर्षापूर्वीचे होते. हे म्हणणे खरे नाही की पावसामुळे दुकान पूर्णपणे पडले. हे म्हणणे खरे आहे की १६/०५/२०१७ रोजी नगर परिषदने दुकान जुने असल्याने मला नोटीस दिली होती. मला आता ती निशाणी १८/१ कडील ती नोटीस दाखविली. ती तिच नोटीस आहे. नोटीसला **<u>निशाणी ४१</u>**

देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की मला नगरपालिकेने नोटीस दिली त्यावेळी प्रतिवादी ने दुकान जुने झाल्याने खाली करा असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**.
**फेरतपासणी नाही**.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

**स्वाक्षरी/-**
( मोहन रा. कामत )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कामठी

कामठी
दिनांक १८/०६/२०२४